| | |
|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**<br>**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**<br>**फोन नं ०२२-२९४५१००१**<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in |


**प्रेसनोट क्रमांक :- २७४** **दिनांक :- ०१/१०/२०२१**

# मोटारसायकल चोरीचे १० गुन्हे उघडकिस करून आरोपी अटकेत- गुन्हे शाखा कक्ष-१ काशिमिरा यांची कामगिरी.

दिनांक १८/०९/२०२१ रोजी रात्री १०:०० वा. ते दिनांक १९/०९/२०२१ रोजी सकाळी ९:३० वाजताचे दरम्यान गोकुळ केमीस्ट मेडीकल शॉपसमोर, साईबाबा नगर, मिरारोड पुर्व येथे फिर्यादी मयुर अरूण गायकवाड वय ३५, रा. विठ्ठलेस कॉ.ऑप हौसींग सोसा. दामोधर म्हात्रे मार्ग, दहिसर पश्चिम मुंबई यांचे मालकीची ५०,०००/- रुपये किंमतीच यमाहा किं.ची निळया रंगाची आर १५ मोटारसायकल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेल्याबाबत मिरारोड पोलीस ठाणे येथे गुरनं ३२३/२०२१ भादंवि ३७९ प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटिकरण कक्ष-१, यांनी घटनास्थळावरुन तांत्रिक पुरावे व मिळालेल्या गोपनीय बातमीच्या आधारे सदर प्रकारचे गुन्हे करणारे संशईत इसम नामे १) अय्युब अली बच्चा मियॉ अली वय २८, रा. मिरारोड पुर्व २) इस्माईल अस्लम साह वय २३ रा. काशिमिरा ३) अलीसा दौलत हिवाळे वय २१, रा. काशिमिरा यांना दिनांक २२/०९/२०२१ रोजी ताब्यात घेण्यात येवून त्यांचेकडून कसून तपासणी केली असता त्यांनी मिरा-भाईंदर व मुंबई परिसरातून १० मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिल्याने त्यांचेकडून १० मोटारसायकल, २ मोबाईल व मोटारसायकल चोरी करण्यासाठी वापरलेली कटर व इतर साहित्य असे ४,६०,४७०/-रुपये किंमतीचा मुद्देमाला जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांकडून मिरारोड, काशिमिरा, नवघर व एम एच बी पोलीस ठाण्यातील वाहन चोरीचे एकुण ७ गुन्हे उघडकीस आले आहे.

सदरची कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. अविराज कुराडे, सपोनि. किशोर टोपले, पोउपनि. हितेंद्र विचारे, पुष्पराज कुराडे, सहा.पोउपनी. महादेव पाठक, राजु तांबे, पोहवा संदिप शिंदे, किशोर वाडिले, अर्जुन जाधव, संजय शिंदे, अविनाश गरजे, पोना पुष्पेंद्र थापा, विजय गायकवाड, सचिन सावंत, प्रशांत विसपुते, पोशि विकास राजपुत सर्व नेमणुक गुन्हे प्रकटिकरण शाखा १ काशिमिरा यांनी पार पाडली आहे.

---००---